




साप्ताहिक

# संघर्षाचा आवाज

प्रशासकीय व सामाजिक व्यवस्थेचा समतोल साधणारा...

पुणे, ठाणे आणि मुंबईसह महाराष्ट्रातील घडामोडींचा वेध घेणारे वृत्तपत्र

संपादक : संजय सोनवणे

■ RNI. NO. MAHMAR/2013/52905
■ DECL. NO. SDM/SR/11/2013
■ https://sangharshachaawaz.in

■ वर्ष : १४ वे ■ अंक : ०७ वा ■ सोमवार दि.०७ सप्टेंबर ते १३ सप्टेंबर २०२६ ■ किंमत : २ रु. ■ पाने - ०४



कोथरूड विधानसभा मतदार... पान २ वर | पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील... पान ३ वर | पुणे जिल्ह्यातील विद्यार्थी... पान ४ वर


# विकास कामांच्या निविदांच्या तांत्रिक तपासणी कार्यवाहीस होणाऱ्या दिरंगाईबाबत आयुक्त नवल किशोर राम यांनी कार्यालयीन आदेश काढून नगरसेवक, अधिकारी आणि ठेकेदार यांच्या भ्रष्ट युतीला सुरूंग लावला आहे?

## संबंधित खातेप्रमुख/उपआयुक्त यांनी जबाबदारी पार न पाडल्यास प्रथमतः दंडात्मक व तदनंतर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल






निवेदन

साप्ताहिक संघर्षाचा आवाज

■ वर्ष : १३ वे ■ अंक : ४५ वा ■ सोमवार दि. ०१ जून ते ०७ जून २०२६ ■ किंमत : २ रु. ■ पाने - ०४

अधिकारीच करोडो रूपयांचे काम विशिष्ठ ठेकेदाराला मिळावे म्हणून काम करित आहे तर दुसरीकडे सत्ताधारीसह विरोधक आणि आयुक्त नवल किशोर राम गप्पगार आहे?

नगररोड, येरवडा, ढोलेपाटील क्षेत्रीय कार्यालय प्रमुख आणि उपायुक्त श्री.माधव जगताप यांच्या स्थावर जंगम मालमत्तेची चौकशीचे आदेश आयुक्त नवल किशोर राम देणार का?

निविदा अटी-शर्ती नेमके कशासाठी....

निवेदन

साप्ताहिक संघर्षाचा आवाज

■ वर्ष : १३ वे ■ अंक : ४७ वा ■ सोमवार दि. १५ जून ते २१ जून २०२६ ■ किंमत : २ रु. ■ पाने - ०४

पावसाळ्यापूर्वीच्या ६० कोटीच्या कामात पुरावे देवूनही कारवाई होत नसेल तर सत्ताधाऱ्यांसह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारीही यात आहेत का?

भाग-३

'संघर्षाचा आवाज'चा दणका

**पुणे** : पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्राअंतर्गत विकास कामे करत असताना पुणे महानगरपालिका त्यांच्या विविध खात्यांच्या माध्यमातून विविध विकास कामे करत असताना त्या-त्या कामाची निविदा लावल्यानंतर ते काम करण्यासाठी मोठ्या प्रमाणात स्पर्धा होवून पुणे महानगरपालिकेचे नुकसान न होता. सार्वजनिक कामे ही चांगल्या दर्जाची व्हावी ही अपेक्षा असते. पण कित्येक प्रकरणामध्ये सत्ताधारी, ठेकेदार आणि अधिकारी यांचे संगनमत झाल्याने एकाच ठेकेदाराला डोळ्यासमोर ठेवून निविदा बनविणे. त्या निविदेतील अटी-शर्ती संबंधित ठेकेदाराला सोयिस्कर ठरेल या पध्दतीने तयार करणे. या पध्दतीची कामे मोठ्या प्रमाणात उजेडात आले आहे. या विषयावर नेहमीच विरोधी पक्षनेते, विविध गटनेते, साप्ताहिक संघर्षाचा आवाज आणि इतर वृत्तपत्रांच्या माध्यमातून सत्य मांडण्याचा आणि महापालिका प्रशासन प्रमुख तसेच सत्ताधारी यांच्यासमोर आणण्याचा प्रयत्न केला आहे. आपण कित्येकवेळा पाहिले असेल की, १० ते २५ लाखाचे काम असो की करोडो रूपयांचे काम असो यामध्ये पात्र/अपात्र करण्यामध्ये संबंधित अधिकारी यांनी (पान ४ वर)

# COEP च्या 'सम्यक विद्यार्थी आंदोलना'च्या पाठपुराव्याला यश; ५ विद्यार्थ्यांना पुढील वर्षाच्या प्रवेशाची परवानगी

**पुणे** : COEP Technological University मधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणीबाबत सम्यक विद्यार्थी आंदोलनाने केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून, विद्यापीठाने एकूण पाच विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षासाठी Registration करण्याची परवानगी दिली आहे. त्यामुळे प्रशासकीय प्रक्रियेतील अडचणीमुळे शैक्षणिक वर्ष धोक्यात आलेल्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

३ ऑगस्ट ला COEP Technological University मधील Second Year B.Tech Metallurgy शाखेचा विद्यार्थी परम अजय शाह याने LLC विषयाच्या backlog च्या manual registration प्रक्रियेत आलेली अडचण सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे किरण दिलीप सैंदाणे यांच्याकडे मांडली होती. संबंधित प्रक्रियेनुसार प्रयत्न करूनही विषयाची नोंद वेळेत होऊ न शकल्याने त्याचे संपूर्ण शैक्षणिक वर्ष धोक्यात येण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. विद्यार्थ्याची समस्या समजून घेतल्यानंतर किरण सैंदाणे यांनी हा प्रश्न




सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या माध्यमातून विद्यापीठ प्रशासनासमोर मांडला. प्रशासकीय प्रक्रियेमुळे विद्यार्थ्याचे एक वर्ष वाया जाता कामा नये, अशी भूमिका घेत विद्यार्थ्याला न्याय्य संधी मिळावी आणि त्याचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.

या पाठपुराव्यानंतर दिनांक १ सप्टेंबर २०२६ रोजी COEP Technological University कडून अधिकृत परिपत्रक जारी करण्यात आले. या परिपत्रकानुसार एकूण पाच विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षासाठी Registration करण्याची परवानगी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे एका विद्यार्थ्याने मांडलेल्या प्रश्नाला न्याय मिळण्यासोबतच अन्य चार विद्यार्थ्यांनाही शैक्षणिक पुढील वाटचालीची संधी मिळाली आहे. याबाबत बोलताना किरण दिलीप सैंदाणे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर केवळ सोशल मीडियावर आवाज उठवणे पुरेसे नाही. विद्यार्थ्यांची समस्या प्रशासनाच्या टेबलवर घेऊन जाणे, त्यांची बाजू ठामपणे मांडणे आणि प्रश्न सुटेपर्यंत पाठपुरावा करणे, हीच सम्यक विद्यार्थी आंदोलनाची भूमिका आहे.

# दलित साहित्य ही समाजाची गरज 'उर्गेन आर्ट फेस्टिवल' मध्ये ज्येष्ठ साहित्यिकांची भावना

## करुणादीप फाउंडेशन आणि त्रिरत्न वैरोचना सेंटर आयोजित उर्गेन आर्ट फेस्टिवलचा समारोप

**पुणे** : अस्पृश्यता ,जातीयता आणि त्यामधून माणसा माणसांमध्ये भेदाभेद आजही अस्तित्वात आहे. त्यामुळे दलित समाजाचे दुःख आणि वेदना आजही तसेच कायम आहेत. या वेदनेला फुंकर घालून दलित साहित्याने वास्तव मांडले. जातीयता संपवून सामाजिक सलोखा आणि समानता प्रस्थापित करण्यासाठी दलित साहित्याची आजही समाजाला गरज आहे अशी भावना ज्येष्ठ साहित्यिकांनी व्यक्त केली.

करुणादीप फाउंडेशन आणि त्रिरत्न वैरोचना सेंटर यांच्यातर्फे बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या उर्गेन आर्ट फेस्टिवल मध्ये कलाकार परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये ज्येष्ठ साहित्यिक आणि विचारवंतांनी दलित साहित्य आणि त्याचा कलेशी असणारा संबंध त्यांचा संदर्भात चर्चा केली. पद्मश्री ग्नवाग संपतेन, डॉ.विमलताई एस. थोरात, शाहीर संभाजी भगत आणि कवी नितीन चंदनशिवे या चर्चासत्रामध्ये सहभागी




झाले होते.

डॉ. विमल थोरात म्हणाल्या, महाराष्ट्रने सर्वप्रथम दलित साहित्याला जन्म दिला. आज हे दलित साहित्य संपूर्ण भारतामध्ये पसरले आहेत. भारताचे २२ भाषांपैकी २० भाषांमध्ये सक्रिय लेखक दलितांचा संदर्भात लेखन करत आहेत. दलित साहित्य हे वेगवेगळ्या भाषांमध्ये भाषांतरित होणे गरजेचे आहे, शब्दशः नसले तरी त्याचा भावार्थ एका वर्षातून दुसऱ्या भाषेमध्ये पोहोचला तर त्यातून दलितांचे दुःखामध्ये समाजाच्या काळापर्यंत पोहोचू शकतात.

शाहीर संभाजी भगत म्हणाले, सत्तेच्या राजकारणापलीकडे एक सांस्कृतिक राजकारण अस्तित्वात आहे. सत्तेचे राजकारण काही क्षण असतात परंतु सांस्कृतिक राजकारण मात्र कायमस्वरूपी असते. दलितांचे दुःख आणि वेदना मांडण्यासाठी समांतर सांस्कृतिक राजकारण उभे करण्याची (पान ३ वर)

# संपादकीय...

## कोथरूड विधानसभा मतदार संघातील विकास कामाकडे मोर्चा वळणार?

एक गोष्ट अगदी स्पष्ट आहे-सोशल मीडियावर व्यक्त होताना भाषेची मर्यादा आणि सभ्यतेचे भान प्रत्येकाने राखायलाच हवे. कोणाचीही वैयक्तिक बदनामी किंवा महिलांबद्दल आक्षेपार्ह शेरेबाजी कधीच समर्थनीय ठरू शकत नाही. मात्र, जर भाषेच्या आडून मूळ भ्रष्टाचाराचा, रस्त्यांच्या दुरावस्थेचा आणि उधळपट्टीचा प्रश्नच पद्धतशीरपणे गाडला जात असेल, तर ती थेट लोकशाहीची गळचेपी आहे. दुसरीकडे पुण्यात डीजेच्या कानठळ्या बसवणाऱ्या आवाजाविरोधात आवाज उठवणारे जागृत कार्यकर्ते विद्यानंद बापट यांच्यावर थेट कॅमेऱ्यासमोर हल्ला होतो आणि इथे प्रश्न विचारणाऱ्या संतोष पंडितांना मध्यरात्री बेड्या ठोकल्या जातात. 'सत्ताधाऱ्यांपुढे तोंड उघडाल तर तुमचा एक तर बापट होईल किंवा पंडित होईल? हा सरळ आणि धोक्याचा इशारा आहे?

पण इतिहास साक्षी आहे, जेव्हा जेव्हा व्यवस्थेने एका बापटांना किंवा एका पंडितांना गप्प करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा तेव्हा व्यवस्थेला जाब विचारणारे हजारो चेहरे रस्त्यावर आणि सोशल मीडियावर उभे राहिले आहेत. सत्तेला प्रश्न विचारणे हा लोकशाहीचा प्राण आहे. हे दुर्लक्षित करून चालणार नाही. बापट, पंडित आप आगे बडो हम तुम्हारे साथ है असे म्हणत 'लोकशाही जिंदाबाद' अशा जोरदार घोषणाबाजी करत पुणेकरांनी गुडलक चौक येथील कलाकार कट्ट्यावर शुक्रवारी (दि.४) सायंकाळी एकत्र येत विद्यानंद बापट यांच्यावरील मारहाणीचा आणि समाज माध्यम प्रभावक संतोष पंडित यांच्या अटकेचा निषेध नोंदवला. या आंदोलनाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

नॅशनल स्टूडंट्स युनियन ऑफ इंडिया आणि ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन यांच्यातर्फे या निषेध सभेचे आयोजन करण्यात आले होते. या आंदोलनाला भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष यांनी सक्रिय पाठिंबा दर्शवला. आंदोलनकर्त्यांनी संतोष पंडित व विद्यानंद बापट यांच्या समर्थनाचे फलक झळकावून न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरू ठेवण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला.

पुणे शहर काँग्रेस पूर्व विभागाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप म्हणाले, शहरात घडणाऱ्या चुकीच्या घटनांच्या निषेधार्थ आम्ही येथे आलो आहोत. बापट यांच्यासारख्या सर्वसामान्यांचा आवाज उठवणाऱ्या कार्यकर्त्याला मारहाण झाली आहे. केवळ एका मंत्र्याला वाईट वाटले म्हणून संतोष पंडित यांना चुकीच्या पध्दतीने अटक करण्यात आली. आम्ही संतोष पंडित आणि विद्यानंद बापट यांच्या पाठीशी ठामपणे आणि खंबीरपणे उभे आहोत असे ते म्हणाले. तर दुसरीकडे आंदोलन सुरू असाताना अचानक भारतीय जनता पक्षाचा समर्थक या आंदोलनामध्ये आला. त्याने भाजप समर्थनात घोषणाबाजी केली. त्यामुळे आंदोलक आणि भाजप समर्थकात काही क्षणांसाठी तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, घटनास्थळी तैनात असलेल्या पोलिसांनी प्रसंगावधान राखून तात्काळ मध्यस्थी केली आणि परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वी शांत करत भाजप समर्थकाला बाजूला केले. पुण्यातील ध्वनिप्रदूषणाविरोधात आवाज उठवल्यानंतर जेव्हा काहींनी आमच्या धार्मिक भावना दुखावल्या असे म्हटले, तेव्हा बापटांनी त्यावर उपरोधिक टिप्पणी केली. भावना म्हणजे छाती, डोकं किंवा पोट नव्हे, की जे दुखायला लागेल! भावना दुखणे हा केवळ लोकांचा एक दिखावा किंवा कांगावा आहे, केवळ युक्तिवादापासून पळ काढण्याचा मार्ग आहे. असे ते म्हणतात.

हे मात्र नक्की की, पुणे शहरातील नागरिकांचे लक्ष मोठ्या प्रमाणात कोथरूड विधानसभा मतदार संघात चंद्रकांतदादा पाटील यांनी केलेल्या कामाकडे लक्ष लागले आहे.

चंद्रकांतदादा पाटील यांनी कोथरूड विधानसभा मतदार संघातील प्रभाग क्र.१३ मध्ये म्हात्रे पुल, रिलायन्स मॉल शेजारी ओपन जिम बसविणे करिता ९,८०,७४४/- इतक्या किमतीची जिम बसवली आहे. आणि ही ओपन जिम २०२२ ते २०२३ या विकास कार्यक्रमामध्ये बसविण्यात आली आहे. तसेच या अगोदरच्या आमदार श्रीमती मेधाताई कुलकर्णी यांनी त्यांच्या आमदार स्थानिक विकास निधीतून सन २०१७ ते २०१८ मध्ये राहुलनगर परिसरात कोथरूड येथे ओपन जिम त्याचपध्दतीने एकूण रक्कम ३,००,०००/- लाखात बसविली आहे. त्याचप्रमाणे शिवाजीनगर विधानसभा मतदार संघाचे आमदार श्री.सिध्दार्थ अनिल शिरोळे यांनी यांच्या आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२४-२०२५ मध्ये शिवाजीनगर मतदार संघातील येरवडा येथील स्वर्गीय बिंदू माधव ठाकरे चौक ते डेक्कन कॉलेज रोड येथील पद पथावर ओपन जिम बसविणेकरिता १०,००,०००/- खर्ची करण्यात आले आहे. याच पध्दतीची ओपन जिम फक्त ४,००,०००/- रूपये मध्ये खडकवासला विधानसभा मतदार संघाचे आमदार श्री.भिमराव अण्णा तापकीर यांनी सन २०२३-२०२४ मध्ये खडकवासला विधानसभा-मानाजी नगर (साद) नऱ्हे येथे ओपन जिम बसविली आहे. यामुळे भ्रष्टाचार किती मोठ्या प्रमाणात आणि कोणत्या स्तरावर होतो आहे. हे पाहून मोठ्या प्रमाणात चर्चा होताना दिसते की, उच्चतंत्र शिक्षण मंत्री आणि या मतदार संघाचे आमदार श्री.चंद्रकांतदादा पाटील यांच्या कार्यकाळात करण्यात आलेल्या विकास कामाची वर्षनिहाय माहिती मागविण्यात आली पाहिजे. असे सोशल मिडीयावर मोठ्या प्रमाणात चर्चा होताना दिसत आहे.


साप्ताहिक संघर्षाचा आवाज मालक - यशोदा उत्तरेश्वर सोनवणे, यांनी सा. संघर्षाचा आवाज संपादक, मुद्रक, प्रकाशक संजय सोनवणे यांना सर्व अधिकार दिले आहे. त्यांनी श्री साई ग्राफिक्स, डी. एस. के. चिंतामणी कॉम्प्लेक्स. विंग - सी - २, शॉप नं. ३८, शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून सर्व्हे नं. ८, नेताजीनगर, येरवडा, पुणे - ४११००६ येथून प्रकाशित केले.

Yashoda Uttareshwar Sonwane, the owner of Weekly Sangharshacha Aawaz, has given all rights to the Sanjay Uttareshwar Sonwane, editor, printer, publisher of Weekly Sangharshacha Aawaz. This weekly is printed at Shri Sai Graphics, D. S. K. Chintamani Complex, Wing C-2, Shop No. 38, Shaniwar Peth, Pune - 411030 and published at Survey No. 8 Netajinagar, Yerawada, Pune - 411006.

या साप्ताहिकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयांतर्गत सोडवली जातील अन्यत्र कोठेही नाही.

**आपल्या प्रतिक्रिया येथे नोंदवाव्यात**
Email : sangharshachaaawaz22@gmail.com
Email : sangharshachaaawaz@rediffmail.com
Mob. : 7276871008 / 9665487134



## सिगोलवाद सुत्त

मला उपलब्ध वाङ्मयाद्वारे धर्मासंबंधी जे ज्ञान प्राप्त झाले. त्याचे सर्वासाठी विवरण करावे असे वाटले आणि धम्मप्रचाराच्या कामास सुरूवात करावी असे वाटले. विचार मनाना भावला लिखाणाचे अंग नोकरीत असल्यापासून आहे, धम्मासंबंधी मला पटलेल्या लहान विषयावर आधारित बाबी पुस्तकरूपाने समाजास देणे ही योजना आहे. भगवंताच्या सुत्तातील अर्थ मला समजला तसा मी मांडला आहे, अर्थात माझ्या आचरणाला धर्म मी सांगतोय. मला लेखक व्हायचे नाही. धम्माच्या आचरणाद्वारा प्रचार करावयाचा आहे. त्यासाठी माझ्या बुध्दीनुसार, आकलनानुसार मी प्रयत्न करण्याचे धाडस केले आहे व ते पुढेही चालू ठेवणार आहे. प्रोत्साहन मिळाल्यास माझाही हुरूप वाढेल व पुढील काम विनाविलंबाने करीन.

जयभीम!

**उत्तमराव सोनवणे**

**मागील अंकावरून**

दुसऱ्याचे नुकसान करण्याची इच्छा धरणारे, वाईट मित्र, सोबती ही सहा कारणे मनुष्याच्या सत्यानाशास कारणीभूत ठरतात.

ज्याचे मित्र व सहयोगी, सोबती जर पापानी बरबटले असतील तर तो दोन्ही जगात नष्ट-भ्रष्ट होईल. या लोकात व परलोकात देखील जुगार, परनारीगमन, दारू, नाच, गाणे, दिवसभर झोप. अनेक गल्ली बोळांत फिरणे, वाईटाची संगत, परकोटीचा लोभ अशा एकूण नऊ कारणांनी मनुष्य बरबाद होतो. नेस्तनाबूत होतो.

जो जुगार खेळतो, जो नशापाणी करतो, परस्त्रीशी अनैतिक संबंध ठेवतो. जो नीच लोकांची संगत करतो, ज्ञानी लोकांची संगत करित नाही, त्यांचा सहवास टाळतो त्याची अधोगती होते. जशी कृष्ण पक्षातील चंद्राची कला. **क्रमश:**

# लंडनमध्ये द्वेषाला स्थान नाही; अमेरिकेनंतर ब्रिटनमध्येही मोहन भागवतच्या दौऱ्याला विरोध; RSS वर बंदी घालण्याची मागणी

**मुंबई :** अमेरिकेच्या दौऱ्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (RSS) सरसंघचालक मोहन भागवत सध्या ब्रिटन दौऱ्यावर असून, लंडनमधील त्यांच्या प्रस्तावित कार्यक्रमाला विविध संघटनांकडून विरोध करण्यात येत आहे. लंडनमधील १५ संघटना आणि काही व्यक्तींनी महापौर सादिक खान यांना पत्र लिहून RSSच्या कार्यक्रमांसाठी ग्रेटर लंडन अथॉरिटीची कोणतीही जागा उपलब्ध करून देऊ नये, अशी मागणी केली आहे. मोहन भागवत यांच्या लंडन दौऱ्यापूर्वीच RSS विरोधात निदर्शने आणि निषेध सुरू झाले आहेत. संबंधित संघटनांनी आपल्या पत्रात RSSवर गंभीर आरोप करत या संघटनेचे स्वरूप हुकूमशाही, लष्करी गट तसेच फॅसिस्ट असल्याचे म्हटले आहे. तसेच, महापौर कार्यालयातील कोणताही प्रतिनिधी RSSशी संबंधित कार्यक्रमांना उपस्थित राहणार नाही, याची पुष्टी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

### 'द्वेषाला स्थान नसावे'; जेरेमी कॉर्बिन यांचा विरोध

ब्रिटिश खासदार जेरेमी कॉर्बिन यांनीही मोहन भागवतच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर RSSवर टीका केली आहे. उजव्या विचारसरणीच्या हिंसेचा गंभीर इतिहास असलेल्या संघटनेच्या नेत्याला ब्रिटनने आश्रय देऊ नये, असे त्यांनी म्हटले आहे. लंडनसारख्या शहरात अशा प्रकारच्या द्वेषाला स्थान नसावे, अशी भूमिकाही कॉर्बिन यांनी व्यक्त केली.


महापौर सादिक खान यांना पत्र लिहिणाऱ्या संघटनांमध्ये Hindus for Human Rights, UK-Indian Muslim Council, India Labour Solidarity आणि South Asia Solidarity Group यांचा समावेश असल्याचे सांगण्यात आले आहे.

अमेरिकेनंतर ब्रिटनमध्येही RSSविरोधात निदर्शने यापूर्वी मोहन भागवतच्या अमेरिकेतील दौऱ्यादरम्यान न्यूयॉर्कमध्ये होणाऱ्या कार्यक्रमालाही विविध संघटनांनी विरोध केला होता. आता ब्रिटनमध्येही RSSविरोधात आवाज उठवण्यात आला आहे. भारतातही RSSवर बंदी घालण्याची मागणी विविध स्तरांतून होत असल्याचे या पार्श्वभूमीवर नमूद केले जात आहे.




वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी RSS ला मनुवादी संघटना संबोधत समाजात द्वेष पसरविण्याचे काम संघटनेकडून होत असल्याचा आरोप गेल्या अनेक दशकांपासून सातत्याने करत आहेत. त्यामुळे RSSवर बंदी घालावी, अशी भूमिका त्यांनी यापूर्वी मांडली आहे.

मोहन भागवतच्या दौऱ्याला विरोध करणाऱ्या संघटनांनी २००२ मधील गुजरात दंगलीतील RSSच्या भूमिकेचाही संदर्भ दिला आहे. तत्कालीन ब्रिटिश उच्चायुक्तालयाच्या अहवालाचा हवाला देत RSSवर भेदभावाला प्रोत्साहन देणे आणि धार्मिक अल्पसंख्याकांना लक्ष्य केल्याचे आरोप करण्यात आले आहेत. RSSच्या कथित भूमिका आणि कृती ब्रिटनच्या मूल्यांशी विसंगत असल्याचा दावा या संघटनांनी पत्रातून केला आहे. दरम्यान, मोहन भागवतच्या लंडन दौऱ्याला होणारा विरोध आणि महापौर सादिक खान यांना देण्यात आलेल्या निवेदनामुळे ब्रिटनमधील RSSच्या कार्यक्रमांवरून राजकीय आणि सामाजिक वातावरण तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



# पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील प्रशासकीय, अभियांत्रिकी, आरोग्य व इतर संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरणेबाबत मुख्य सभेमध्ये विषय मांडणार - स्थायी समिती अध्यक्ष, श्रीनाथ भिमाले





निवेदन

साप्ताहिक

संघर्षाचा आवाज

RNI. NO. MAHMAR/2013/52905

कमी कालावधीत मोठ्या प्रमाणावर नव्याने आकारणी केली तसेच वसुलीबाबत अधिक ठोस पावले उचलली तरीही तडकाफडकी बदली हे योग्य नाही - पुणे महापालिका कामगार युनियन

वरं जनहितं ध्येयम्।

अवघ्या पाच महिन्यात ४३,५५६ नव्या मिळकती आणि १७७०.७९ कोटी जमा केले तर त्यांना देण्यात आलेले टार्गेट पुर्ण कसे होणार नाही, याचाही विचार करावा अशी विनंती सेवकांनी केली

**पुणे :** पुणे महापालिकेतील उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांनी अतिरिक्त आयुक्तांवर (वरिष्ठ अधिकाऱ्यांवर) दुजाभाव आणि अपमानास्पद वागणूक दिल्याचा आरोप करत आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे काही दिवसापुर्वी अधिकृत तक्रार केली होती. शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिकाऱ्यांना झुकते माप दिले जात असून महापालिकेतील सेवेत असलेल्या अधिकाऱ्यांना डावलले जात आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कामाच्या ठिकाणी सन्मानाने वागणूक मिळत नसल्याची आणि अपमानास्पद शब्दांत बोलले जात असल्याची तक्रार निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या प्रकारामुळे पुणे महानगरपालिकेच्या प्रशासकीय वर्तुळात अंतर्गत नाराजी आणि वाद चव्हाट्यावर आला होता. हे प्रकरण ताजे असतानाच पुणे महानगरपालिका कामगार युनियनने पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील प्रशासकीय, अभियांत्रिकी, आरोग्य व इतर संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरणेबाबत निवेदन स्थायी समिती अध्यक्ष, श्रीनाथ भिमाले यांना देण्यात आले. तेव्हा ते म्हणाले की, हा विषय मुख्य सभेपुढे मी आणणार. मी तुमच्यासोबत आहे असे म्हणून त्यांनी या शिष्टमंडळाला प्रोत्साहन दिले. यावेळी पुणे महानगरपालिका कामगार युनियनचे अध्यक्ष उदय भट, कार्यअध्यक्ष मधूकर नरसिंगे, पीएमसी ऍम्पलॉईज युनियनचे अध्यक्ष बजरंग पोखरकर, जनरल सेक्रेटरी श्रीकांत चव्हाण, पीएमसी इंजिनियअर्स असोसिएशनचे सचिव सुनिल कदम, डॉ.असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.गणेश जगदाळे, अधिकारी संघचे उपाध्यक्ष माधव जगताप आणि पुणे महापालिकेच्या विधी प्रमुख अधिकारी ॲड.निशा चव्हाण उपस्थित होते.

या निवेदनामध्ये म्हणतात की, पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील प्रशासकीय, अभियांत्रिकी, आरोग्य तसेच इतर विविध संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची अनेक पदे सध्या मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत. शासनाकडून ज्या जागांवर अधिकाऱ्यांची प्रति नियुक्ती मनपा जागांवर झालेली आहे. ती सर्व पदे तातडीने रिक्त करून घेऊन त्यावर महानगरपालिकेकडील अधिकायांना नियुक्त करावी. पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील अतिरिक्त महापालिका आयुक्त, उप आयुक्त व सहाय्यक आयुक्त या पदावर महापालिकेच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी.

सद्यस्थितीत पुणे महानगरपालिका आकृतीबंधानुसार अतिरिक्त महापालिका आयुक्त या पदाची माहिती पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे. यामध्ये अतिरिक्त महापालिका आयुक्त या पदासाठी प्रतिनियुक्तीवर २ जागा आहेत. पण या पदावर ३ जागा भरल्या आहेत. तसे पाहता पदोन्नतीने १ जागा भरणे अत्यावश्यक आहे. पण ती जागा भरण्यात आली नाही. तसेच सद्यस्थितीत पुणे महानगरपालिका आकृतीबंधानुसार उपायुक्त या पदाची माहिती पुढीलप्रमाणे आहे. यामध्ये उपायुक्त हे पद ५० टक्के पदोन्नतीने ९ जागा भरणे आवश्यक आहे. पण येथे ८ जागा भरलेल्या आहेत. यातील १ जागा रिक्त आहे. तर प्रतिनियुक्तीने ५० टक्के जागा भरायच्या आहेत. या पदासाठी ९ जागा आहेत. पण येथे १० जागा भरलेल्या आहेत. १ जागा पुणे महापालिकेच्या अधिकाऱ्याला डावलून भरण्यात आलेली आहे. या खालोखाल सद्यस्थितीत पुणे महानगरपालिका आकृतीबंधानुसार सहाय्यक आयुक्त या पदाची माहिती पुढीलप्रमाणे देत आहोत. यामध्ये ५० टक्के पदोन्नतीने एकूण ११ जागा भरायच्या आहेत. पण येथेही ६ जागा भरल्या आहेत. येथेही पुणे महापालिकेच्या ५ अधिकाऱ्यांना डावलण्यात आले आहे. तर प्रतिनियुक्तीने २५ टक्के जागा भरायची आहे. यामध्ये ६ जागा असताना येथे १३ जागा प्रतिनियुक्तीवर भरल्या आहेत. यामुळे येथे ७ जागा जास्त आहेत. तसेच या पदासाठी सरळसेवेने २५ टक्के जागा भरावयाची आहे. म्हणजे एकूण ५ जागा पण यासाठी एकही जागा भरलेली नाही. सदर रिक्त पदांपैकी बहुतांश रिक्त पदांवर शासनाच्या विविध विभागांकडून प्रतिनियुक्तीच्या माध्यमातून अधिकारी/कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्यामुळे मनपा सेवकामध्ये अन्यायकारक भावना निर्माण झाली असून महानगरपालिकेच्या सेवेत अनेक वर्षे प्रामाणिकपणे व निष्ठेने सेवा बजावणारे अधिकारी व कर्मचारी आवश्यक ती शैक्षणिक, तांत्रिक तसेच सेवाकालीन अर्हता पूर्ण करूनही केवळ पदोन्नतीची प्रक्रिया प्रलंबित असल्यामुळे पुढील पदावरील संधीपासून वंचित राहत आहेत. परिणामी, महानगरपालिका सेवकांमध्ये असंतोष निर्माण होऊन त्यांचे मनोबल खच्चीकरण होण्यांची शक्यता आहे. महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उपलब्ध मनुष्यबळाचा कार्यक्षम वापर करणे, सेवकांना त्यांच्या सेवाज्येष्ठता, पात्रता व नियमानुसार पदोन्नतीची संधी उपलब्ध करून देणे, आवश्यकतेनुसार वरिष्ठ पदाचे अतिरिक्त पदभार देणे तसेच सेवकांमध्ये कार्यक्षमता व सकारात्मक वातावरण निर्माण करणे, या दृष्टीने रिक्त पदे शक्य तितक्या लवकर पदोन्नतीने भरणे अत्यंत आवश्यक आहे.

तसेच, ज्या संवर्गातील पदांसाठी पदोन्नतीची पात्रता पूर्ण करणारे महानगरपालिका सेवक उपलब्ध आहेत, त्या पदांवर बाह्य/प्रतिनियुक्तीवरील नियुक्त्या करण्यापूर्वी महानगरपालिका सेवकांना पदोन्नतीची संधी देण्याबाबत प्राधान्याने विचार होणे आवश्यक आहे. तसेच आवश्यकतेनुसार वरिष्ठ पदाचे अतिरिक्त पदभार सुपूर्त करणे यामुळे महानगरपालिका सेवकांमध्ये आपल्या सेवेतच प्रगतीची संधी उपलब्ध आहे असा विश्वास निर्माण होऊन त्यांचा कामातील उत्साह व कार्यक्षमता वाढण्यास निश्चितच मदत होईल.

सबब पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील प्रशासकीय, अभियांत्रिकी, आरोग्य, मुख्य लेखापाल विभागाक वर्ग-१ च्या पदासाठी तसेच इतर सर्व संवर्गातील रिक्त पदांचा संवर्गनिहाय आढावा घेऊन, पदोन्नतीसाठी आवश्यक अर्हता व मेवाज्येष्ठता पूर्ण करणाऱ्या पात्र अधिकारी/कर्मचाऱ्यांची माहिती तातडीने संकलित करून, नियमानुसार विभागीय पदोन्नती समितीची कार्यवाही करून रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही तातडीने सुरू करण्याबाबत संबंधित विभागांना आवश्यक ते आदेश/सूचना देण्यात याव्यात. तसेच, ज्या पदांवर सध्या प्रतिनियुक्ती अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत, त्या पदांचीही संवर्गनिहाय तपासणी करून, त्या पदांसाठी महानगरपालिका सेवेत पात्र व पदोन्नतीसाठी उपलब्ध सेवक असल्यास त्यांना नियमानुसार पदोन्नतीची संधी देण्याबाबत योग्य तो प्रशासकीय निर्णय घेण्यात यावा. तरी, वरील बार्बीचा सहानुभूतीपूर्वक व सकारात्मक विचार करून पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील रिक्त पदे पात्र व सेवाज्येष्ठ महानगरपालिका सेवकांमधून वरिष्ठ पदाचे अतिरिक्त पदभार देणे तसेच रिक्त पदे नियमानुसार पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही तातडीने सुरू करण्याबाबत आवश्यक ते आदेश देण्यात यावेत, अशी विनंती आहे.

## प्रमुख मागण्या

१. पुणे महानगरपालिकेमध्ये काही आस्थापनेवरील सर्व संवर्गातील रिक्त पदे आहेत त्या ठिकाणी त्या पदासाठी लागणारा कार्यकाल पूर्ण होत नसल्यामुळे सेवकांना पदोन्नती देण्यात येत नाही. त्या पदाचा कार्यकाळाची अट कमी करून मनपा सेवकांना पदोन्नती देण्यात यावी.

२. पदोन्नतीसाठी पात्र परंतु प्रत्यक्ष पदोन्नती न दिलेल्या सेवकांना पदोन्नतीच्या वेतनाचे लाभ देणेस विनंती आहे.

३. पदोन्नतीसाठी आवश्यक अर्हता व सेवाज्येष्ठता पूर्ण करणाऱ्या पात्र सेवकांची यादी तयार करण्यात यावी.

४.पात्र सेवकांच्या पदोन्नतीसाठी विभागीय पदोनती समितीची कार्यवाही तातडीने राबविण्यात यावी.

५. महानगरपालिका सेवक उपलब्ध असलेल्या संवर्गातील रिक्त पदांवर नियमानुसार प्रतिनियुक्तीऐवजी अंतर्गत पदोन्नतीद्वारे पदे भरण्यास प्राधान्य देण्यात यावे.

६. पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील सर्व संवर्गातील रिक्त पदांची संवर्गनिहाय माहिती तातडीने संकलित करण्यात यावी.

७.सध्या प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या पदांची आवश्यकता यांचा आढावा घेण्यात यावा.

८. पदोन्नतीच्या प्रक्रियेस अनावश्यक विलंब होणार नाही, यासाठी संबंधित प्रशासन/आस्थापना विभागास कालबद्ध कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात यावेत

९. पदोन्नतीची संधी उपलब्ध झाल्यामुळे महानगरपालिका सेवकांचे मनोबल बाढून प्रशासनाची कार्यक्षमता व कामकाजाची गुणवत्ता सुधारण्यास निश्चितच मदत होईल.

# दलित साहित्य ही समाजाची गरज 'उर्गेन आर्ट फेस्टिवल'...

**(पान १ वरून)** गरज आहे . मनुवादी आणि ब्राह्मण्यवादी विचारांमधून दलितांवर कायमच अन्याय होत आला आहे, तो जुगारून देण्यासाठी समतावादी, मानवतावादी समाज निर्माण करण्यासाठी दलित साहित्याने आवाज म्हणून त्यांचे दुःख समाजासमोर मांडले पाहिजे.

पद्मश्री ग्रंवाग संपतेन म्हणाले, तथागत गौतम बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील एकता ,समता बंधुता आणि न्याय यांचा समावेश असणारा समाज निर्माण होणे गरजेचे आहे . त्यासाठी दलित साहित्य हे अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. देश अखंडपणे समानतेच्या पायावर उभा राहिला तरच खऱ्या अर्थाने आपण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील भारत निर्माण झाला असे म्हणू शकतो.

नितीन चंदनशिवे म्हणाले, कवितेच्या माध्यमातून वंचित आणि उपेक्षितांचे दुःख समस्या मांडले जात आहे ही मी माझे कवी म्हणून कामच समजतो. कोणत्याही कलाकाराला त्याची कला किंवा लेखक आणि कवीला मिळालेली लेखणी याला तेव्हाच खऱ्या अर्थाने महत्त्व प्राप्त होते जेव्हा तो कलाकार कवी अथवा लेखक सर्वसामान्यांचे दुःख जाणून ते आपल्या कलेच्या माध्यमातून समाजासमोर मांडतो. कलेच्या माध्यमातून किंवा लेखणीतून भलेही ते दुःख दूर होणार नाही परंतु ते मांडता येणे गरजेचे आहे आणि ही निर्भीडता प्रत्येक लेखक आणि कवी मध्ये असणे गरजेचे आहे.

यावेळी संतोष संखद यांनी सूत्रसंचालन केले. दिव्या शिंदे आणि डॉ.अस्मिता गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. डॉ. व्ही. बी. गायकवाड यांनी आभार मानले.


## निवेदन

आपल्या प्रभागातील समस्या, दैनंदिन अडचणी, फसवणूक, अन्याय-अत्याचार, मुजोरी तसेच आपल्या मनातील सूचना, शंका, उपाय यासाठी सा. संघर्षाचा आवाज आपणास खास व्यासपीठ मिळवून देत आहे.

करा त्वरा, होऊ द्या मनातला निचरा!

संपर्क : ७२७६८७१००८, ९६६५४८७१३४

# पुणे जिल्ह्यातील विद्यार्थी, परीक्षार्थी, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था, कोचिंग क्लासेस, अभ्यासिका चालक, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून आपल्या सूचना व अभिप्राय सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे

**पुणे :** राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी तसेच गैरप्रकारांना प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने विद्यमान परीक्षा पद्धतीचा सर्वंकष आढावा घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे.



**सूचना व अभिप्राय सादर करण्याचा तपशील**

**नोडल अधिकारी : निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

**प्रत्यक्ष सादरीकरणाचे ठिकाण : करमणूक कर शाखा, 'बी' विंग, दुसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

**ई-मेल : examcollectorpunegmail.com**

**कालावधी : दि. ७ ते १० सप्टेंबर २०२६, सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत.**

समितीच्या कार्यकक्षेनुसार राज्यातील प्रत्येक महसुली विभागातील विद्यार्थी, परीक्षार्थी, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था, कोचिंग क्लासेस, अभ्यासिका चालक, लोकप्रतिनिधी तसेच अन्य संबंधित घटकांशी चर्चा करून परीक्षा पद्धतीतील सुधारणांसाठी सूचना व अभिप्राय घेण्यात येणार आहेत.

या अनुषंगाने समितीचे अध्यक्ष व सदस्य शनिवार, दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे भेट देणार असून, यावेळी विद्यार्थी व परीक्षार्थींशी संवाद साधून त्यांच्या सूचना व अभिप्राय जाणून घेण्यात येणार आहेत.

पुणे जिल्ह्यातील नागरिक व संबंधित घटकांना आपल्या सूचना, शिफारशी, हरकती व निवेदने सादर करता यावीत यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे. हा कक्ष सोमवार, दि. ७ सप्टेंबर ते गुरुवार, दि. १० सप्टेंबर २०२६ या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत कार्यरत राहणार आहे. ज्या नागरिकांना जिल्हाधिकारी कार्यालयातील विशेष कक्षात प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य नसेल, त्यांनी विहित मुदतीत आपले लेखी अभिप्राय या examcollectorpunegmail.com ई-मेलवर पाठवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

विद्यमान परीक्षा प्रणाली तसेच राज्य शासनाचे विविध विभाग, प्राधिकरणे व परीक्षा घेणाऱ्या संस्थांच्या कार्यपद्धतीबाबत अभिप्राय मागविण्यात येत आहेत. परीक्षा अधिक सुरक्षित, विश्वासार्ह, निष्पक्ष आणि उमेदवाराभिमुख करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबतही सूचना अपेक्षित आहेत.

प्रश्नपत्रिका तयार करणे व मॉडरेशन, डिजिटल अथवा मुद्रित प्रश्नपत्रिकांचे वितरण, गोपनीय वाहतूक, परीक्षा केंद्रांचे व्यवस्थापन, प्रतिसाद नोंदणी, मूल्यांकन व निकाल प्रक्रियेतील सुरक्षा यांचा आढावा घेण्यासाठी सूचना मागविण्यात येणार आहेत. तसेच डिजिटल प्रणाली, बायोमेट्रिक प्रमाणीकरण, प्रवेश नियंत्रण, ऑडिट ट्रेल्स आणि सीसीटीव्ही देखरेख यांसारख्या तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याबाबतही अभिप्राय घेण्यात येणार आहेत.

प्रश्नपत्रिका फुटणे, गोपनीयतेचा भंग, तोतया उमेदवार, संगनमत तसेच इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा गैरवापर यांसारखे गैरप्रकार रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना व संबंधितांची उत्तरदायित्व निश्चित करण्याबाबतही सूचना विचारात घेतल्या जाणार आहेत. इतर राज्ये अथवा देशांतील यशस्वी व सुरक्षित परीक्षा पद्धतींचा अभ्यास, परीक्षा केंद्रांसाठी किमान पायाभूत सुविधा व सुरक्षितता मानके, विविध शासकीय यंत्रणांमधील समन्वय तसेच उमेदवारांसाठी जलद व पारदर्शक तक्रार निवारण व्यवस्था याबाबतही सूचना अपेक्षित आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्राप्त होणाऱ्या सर्व सूचना व अभिप्रायांचे संकलन करून ते उच्चस्तरीय समितीकडे सादर करण्यात येणार आहेत. समिती या सूचनांचा सखोल अभ्यास करून राज्य शासनास सर्वसमावेशक अंतिम अहवाल सादर करणार आहे.

राज्यातील लाखो स्पर्धा परीक्षा परीक्षार्थींच्या भवितव्याशी निगडित असलेल्या या महत्त्वपूर्ण प्रक्रियेत पुणे जिल्ह्यातील विद्यार्थी, परीक्षार्थी, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था, कोचिंग क्लासेस, अभ्यासिका चालक, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून आपल्या सूचना व अभिप्राय सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे.

# विकास कामांच्या निविदांच्या तांत्रिक तपासणी कार्यवाहीस होणाऱ्या दिरंगाईबाबत आयुक्त नवल किशोर राम...

**(पान १ वरून)** नियम नेहमीच फाट्यावर मारला आहे. आणि काम असलेल्या संबंधित नगरसेवकांनी त्यांना पाठीशी घालण्याचे काम केले आहे. त्यामुळे निविदा प्रकरण हे नेहमी चर्चेचा विषय राहिला आहे. आजही पुणे महापालिकेत कित्येक विकास कामांसाठी लावण्यात आलेल्या निविदा यावर कित्येक तक्रारी अर्ज आलेले आहेत. यामध्ये 'अ' पाकीट उघडण्याचा कालावधी आणि त्यानंतर 'ब' पाकीट उघडण्याचा कालावधी आणि त्यासाठी असणारी नियमावली याचा नेहमी भंगच केला असल्याचा दिसत आहे. नुकतेच महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दि.४/९/२०२६ रोजी विकास कामांच्या निविदांच्या तांत्रिक तपासणी कार्यवाहीस होणाऱ्या दिरंगाईबाबत कार्यालयीन आदेश काढून नगरसेवक, अधिकारी आणि ठेकेदार यांच्या भ्रष्ट युतीला सुरूंग लावला असेच म्हणावे लागेल. कारण या आदेशामध्ये पुणे महानगरपालिकेमार्फत मंजूर अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार मूलभूत व विविध विकासाची कामे करण्यात येतात. सन २०२६-२७ चे अंदाजपत्रकानुसार प्राधान्यक्रम ठरवून विकास कामांना व देखभाल दुरूस्तीच्या कामांकरिता वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. वित्तीय मान्यता दिल्यानंतर पूर्वगणकपत्रक तयार करणे व त्यास मा.सक्षम अधिकाऱ्याची प्रशासकीय मान्यता घेऊन निविदा मागविणेबाबत सर्व संबंधित खात्यांकडून विहीत मुदतीत कार्यवाही होणे अपेक्षित आहे. सकृतदर्शनी याबाबत विलंब होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

निविदांची छाननी व मान्यता प्रक्रिया सुलभ व्हावी याकरिता मा.महापालिका आयुक्त ठ.क्र.६/४५३ दि.०८/०९/२०२२ अन्वयेची सुधारीत निविदा कार्यप्रणाली अन्वये सुधारित निविदा कार्यप्रणाली सन २०२२ मध्ये प्रसृत करण्यात आली असून त्यानुसार अंमलबजावणी सुरू आहे. निविदांची तांत्रिक छाननी पाकीट (अ) मधील काही तांत्रिक अडचणींचे निराकरण करण्यासाठी मा.अति.महापालिका आयुक्त जा.क्र .अमआ(वि)/पथ/१२६११ दिनांक३१/०१/२०२४ चे कार्यालयीन आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तांत्रिक छाननी सुलभ होऊन स्पर्धात्मक दर प्राप्त व्हावेत व निविदा कार्यप्रणालीत सुसूत्रता यावी याकरिता मा.महापालिका आयुक्त कार्यालय पुणे मनपा जा.क्र .मआ/साप्रवि/आस्था/७६३७ दि.०४/०९/२०२५ अन्वये विविध स्तरावर निविदा शिफारस समिती नियुक्त केली आहे. यामध्ये तांत्रिक व निविदा दर शिफारस समिती आहे. रक्कम रू.१ कोटीपर्यंत खातेप्रमुख/उप आयुक्त व रक्कम रू.१ कोटी पुढील निविदा रकमेकरिता संबंधित खात्याचे अतिरिक्त महापालिका आयुक्त समितीचे अध्यक्ष आहेत. यामुळे छाननी प्रक्रियेत सुलभता व पारदर्शकता व स्पर्धात्मक दर प्राप्त होत आहेत.

सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकातील क्षेत्रिय स्तरावरील व मुख्य विभागाकडील काही निविदा प्रकरणांबाबत ठेकेदार पात्र/अपात्र चे कार्यवाहीबाबत विलंब व राजकीय हस्तक्षेप होत असलेबाबत वर्तमानपत्रात बातम्या प्रसिध्द होत आहेत. यामध्ये तांत्रिक छाननी पाकीट (अ) उघडल्यानंतर पात्र/अपात्रतेच्या निर्णयासंबंधित विलंब होत असल्याची बाब आमच्या निदर्शनास आली आहे. पाकीट (अ) तांत्रिक छाननीसंबंधी सुधारित निविदा कार्यप्रणालीमधील कलम ४.२, ४.३ यामध्ये ठेकेदार यांचे कागदपत्रांसंबंधी पात्र/अपात्रबाबत सुस्पष्ट निर्देश आहेत. तसेच ४.८, ४.८.१ व अन्य कलम याचे वाचन व अनुपालन केल्यास निविदा छाननी प्रक्रिया सुलभ होणार आहे. या व्यतिरिक्त मा.अति.महापालिका आयुक्त जा.क्र .अमआ(वि)/पथ/१२६११ दिनांक३१/०१/२०२४ अन्वये अतिरिक्त मार्गदर्शक वजा सूचना निर्गमित केल्या आहेत. निविदा जाहिरात प्रसिध्द केल्यानंतर अ पाकीट व ब पाकीट छाननी संबंधित खाते प्रमुख यांनी तात्काळ संबंधित अभियंता यांना छाननी सुरू करणेबाबत निर्देश देणे गरजेचे आहे. जेणेकरून कमाल १५ दिवसाच्या मुदतीत अ पाकीट छाननी, पात्र/अपात्र प्रक्रिया पूर्ण होईल. खात्याकडून विलंबाने मा.निविदा शिफारस समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात येतात त्यामुळे समितीही पात्र/अपात्र बाबत निर्णय घेऊ शकत नाही. मुख्य खात्याकडील प्रकल्पीय कामांकरिता तांत्रिक छाननीबाबत ठेकेदार यांच्या पात्र/अपात्रतेबाबत समस्या उदभवल्यास अपावादात्मक परिस्थितीत ठेकेदार यांच्या पात्र/अपात्र बाबत समस्या उदभवल्यास (प्लान्ट/मशिनरी/अन्य) शहर अभियंता यांचे मार्गदर्शन घेणेस हरकत नाही.

क्षेत्रिय कार्यालयाकडून ठेकेदार यांना पात्र/अपात्र करताना फक्त पूरक कागदपत्रे मागविण्याची मुभा आहे. मा.अति.महापालिका आयुक्त जा.क्र.अमआ(वि)/पथ/१२६११ दिनांक३१/०१/२०२४ चे आदेशाचे पालन करावे. पारदर्शक प्रक्रिया व स्पर्धात्मक दर पात्र होणे यावर भर असावा. मा.महापालिका आयुक्त कार्यालयाकडील जा.क्र.मआ/शअ/४५५६

दि.१४/०८/२०२६ अन्वये २० टक्के पेक्षा कमी दराच्या निविदेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. निविदा दरास मान्यता देणाऱ्या समितीने प्रकरणनिहाय वस्तुनिष्ठ बाबी तपासून त्याबाबत निर्णय घेणे अपेक्षित आहे.

निविदा स्विकृती दिनांकानंतर किमान कालावधीत म्हणजे ०७ दिवसात अ पाकीट छाननी होणेकरिता संबंधित खातेप्रमुख/उप आयुक्त यांचेकडून अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज/वि/इ) यांनी दर १५ दिवसांनी आढावा घेऊन पूर्तता करून घ्यावी. ब पाकीट उघडणेस व सर्वात कमी रकमेच्या निविदाधारकाची शिफारशीसह निविदा समितीची तात्काळ मान्यता घेऊन सक्षम प्राधिकारी यांचेकडे मंजुरीकरिता सादर करावी. रक्कम रू.२५ लक्ष पर्यंतची निविदा मान्य झालेनंतर कमाल ०३ दिवसात व रक्कम रू.२५ लक्ष वरील निविदांची मंजुरी झालेनंतर कमाल ०७ दिवसात कार्यदेश देण्याची प्रक्रिया पूर्ण करावी. सदर निविदांची कामे वरील कारणांमुळे मुदतीत सुरू न झाल्यास संबंधित खातेप्रमुख/उपआयुक्त यांचेवर जबाबदारी निश्चित करून प्रथमतः दंडात्मक व तदनंतर शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित होईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

मनपाकडील मूलभूत सुविधांची कामे विहित मुदतीत पूर्ण करून नागरिकांना सेवा देण्याची जबाबदारी व कर्तव्य आपले सर्वांचे आहे. सबब, वरील सूचनांचे तंतोतंत पालन करावे. असे नवल किशोर राम, महापालिका आयुक्त पुणे महानगरपालिका यांनी सांगितले आहे. आता यापुढे ठरवून एखाद्या ठेकेदाराला पात्र करायचे आणि बाकीच्यांना अपात्र करायचे तसेच अ पाकीट आणि ब पाकीट उघडण्याच्या नियमावली पाळली जाणार का? विकास कामांच्या निविदांच्या तांत्रिक तपासणी कार्यवाहीस होणाऱ्या दिरंगाईबाबत आयुक्त नवल किशोर राम यांनी कार्यालयीन आदेश काढून नगरसेवक, अधिकारी आणि ठेकेदार यांच्या भ्रष्ट युतीला सुरूंग लावला आहे का? हे लवकरच समोर येईल. कारण पुण्याचा विकास होत आहे.